महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७२ वा | दिनांक : १२/१२/२०२४ | वार : गुरूवार

# परभणीमध्ये संचारबंदी, इंटरनेटही बंद





**पभणी :** परभणीतील बंदला हिंसक वळण लागले. आंदोलकांकडून शहरातील काही दुकानांची तोडफोड करण्यात आली. तर काही ठिकाणी वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून अश्रू धुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. मात्र, जमावाकडून पोलिसांच्या दिशेने दगडफेक झाली. दंगल नियंत्रक पथकाला पाचारण करण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आली आहे.

दरम्यान, आंदोलकांमध्ये महिलांचा देखील समावेश होता. अनेक महिला रस्त्यावर उतरल्या. त्यांनीही पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली. परभणी बंद असताना जी दुकाने सुरू होती, अशी दुकाने आंदोलकांनी पेटवून दिल्याची माहिती आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात हा प्रकार घडला.

परभणीतील तोडफोड आणि जाळपोळ प्रकरणी आतापर्यंत ४० जणांना ताब्यात घेतल्याची माहिती नांदेड परिक्षेत्राचे IG शहाजी उमप यांनी दिली. अन्य दंगलखोरांचा शोध सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. दंगेखोरांवार कारवाई करण्यात येत असून गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असेही ते म्हणाले.

परभणीमध्ये आज आंबेडकरी अनुयायांकडून पुकारण्यात आला होता. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले होते. परंतु, या आदेशाला न जुमानता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारी मोठ्या प्रमाणात जमाव जमला होता. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

परभणीतील सध्याची परिस्थिती पाहता जिल्हा प्रशासनाच्या वतीने बुधवारी दुपारी १ वाजेपासून इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. पुढील आदेश येईपर्यंत इंटरनेट सेवा बंद राहील, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने एका पत्रकाद्वारे सांगण्यात आले आहे.

परभणी शहरातील सात ठिकाणी जाळपोळ करण्यात आली. अनेक ठिकाणी बॅनरची तोडफोड करून रस्त्यावर पेटून देण्यात आले आहेत. अग्निशमन दलाच्या वतीने या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परभणीतील आंदोलनाला हिंसक वळण आले असून ठिकठिकाणी जाळपोळ करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांकडून परभणीतील रस्त्यावर मार्च काढण्यात येत आहे.

परभणीतील तणावपूर्ण परिस्थितीमुळे नांदेड परिक्षेत्राचे IG शाहजी उमप शहरात दाखल झाले आहे. शहाजी उमप म्हणाले की, परभणीत मंगळवारी घडलेल्या घटनेनंतर आज बंद पुकारला होता. आज बंद आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणे, असा आंदोलकांचा कार्यक्रम होता. परंतु निवेदन देण्यासाठी येताना काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे फोडले. तर काही ठिकाणी टायर जाळले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात महिला आणि पुरुषांनी तोडफोड केली. परंतु आता परिस्थिती नियंत्रणात असल्याचे IG उमप यांनी सांगितले.

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून येथे अशा घटना सर्रास घडत आहेत. लोकांनी शांतता राखली पाहिजे. आम्ही आणि महाराष्ट्रातील जनता बाबासाहेब आणि त्यांच्या विचारांसोबत नेहमीच राहिलो आहे, हे सर्वांना माहीत आहे, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिली.

# परभणीतील प्रकार निंदनीय : रामदास आठवले

**मुंबई :** संविधनाची विटंबना झाल्यानंतर आज आंबेडकरी अनुयायांकडून परभणी बंदची हाक देण्यात आली होती. परभणी बंदला दुपारनंतर हिंसक वळण लागले. यावर रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संविधानाचा अपमान करणारा आरोपी पकडला गेला असून आंबेडकरी अनुयायांनी शांतता राखावी, असे आवाहन रामदास आठवले यांनी केले. तसेच या सर्व प्रकरणामागे कुणाचा हात आहे का? याची देखील चौकशी व्हावी, अशी मागणीही आठवले यांनी केली आहे.

परभणी येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास संविधानाच्या विटंबना करण्यात आली होती. या विरोधात आंबेडकरी अनुयायांनी बुधवारी परभणी शहर बंदचे आवाहन केले होते. त्यानुसार आज परभणी शहर बंद ठेवण्यात आहे. परंतु, दुपारनंतर या बंदला हिंसक वळण लागले. आंदोलकांनी अनेक ठिकाणी दगडफेक आणि जाळपोळ केली. यावेळी शेकडो वाहनांची तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांवरही दगडफेक करण्यात आली. त्यामुळे पोलिसांनी अश्रू धुराच्या नळकांड्या फोडल्या होत्या.

या प्रकरणावर बोलताना रामदास आठवले म्हणाले, परभणी हे मराठवाड्यातील महत्वाचे शहर आहे. तिथे घडलेली घटना अत्यंत दुर्देवी आहे. ज्या माथेफिरूने संविधान आणि बाबासाहेबांचा अपमान केला. त्याला पोलिसांनी पकडले आहे. परंतु, त्यामागे कोणाचा हात आहे का? याची चौकशी व्हावी, अशी मागणी रामदास आठवले यांनी केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दिल्लीत बोलणार आहे. मी आंबेडकरी अनुयायांना शांतत राखण्याचे आवाहन करतो, असेही रामदास आठवले म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ डिसेंबर २०२४


## काँग्रेस कमिटीच्या वतीने परभणी येथील घटनेच्या दोषींना फाशीची शिक्षा देण्यात यावी याकरिता विभागीय आयुक्तांना निवेदन



**छत्रपती संभाजीनगर :** बुधवारी रोजी चार ०४ वाजता विभागीय आयुक्त यांना परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान व संविधानाची प्रत त्यांची तोडफोड करण्यात आली व संविधानाची विटंबना करण्यात आली.

यांप्रकरणी परभणी येथील समाजकंटाकावर व दोषीवर फाशीची शिक्षा व व्हावी म्हणून विभागीय आयुक्त यांना औरंगाबाद शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष डॉ अरुण शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.

परभणी येथील समाजकंटकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान व संविधानाची प्रत तोडफोड केली म्हणून त्यांना कठोर शासन व्हावे याकरिता निवेदन देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक काँग्रेस विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष इब्राहिम पठाण, अल्पसंख्याक विभागाचे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष मोईन इनामदार, शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अनिस पटेल, शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आकेप रजवी, शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संजय धर्मरक्षक, रेखाताई राऊत, उत्तम दणके, रेखा मुळे, रंजनाताई कांबळे, संजय जाधव, मीनाज पटेल, रियाज पटेल, आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष डॉक्टर अरुण शिरसाठ यांनी केले होते

## डॉ. छाया जैन राज्यस्तरीय काव्य पुरस्कार साठी आवाहन



**छत्रपती संभाजीनगर :** जैन एज्युकेशनल मेडिकल अँड सोशल फाउंडेशन तर्फे दरवर्षी डॉक्टर छाया जैन राज्यस्तरीय काव्य पुरस्कार जाहीर होतो.

त्यासाठी काही कवींनी आतापर्यंत त्यांची पुस्तके पाठवली आहेत व लवकरच याचा निकाल पण जाहीर होणार आहे. परंतु ज्या कवींनी अद्याप आपली पुस्तके पाठवली नसतील; त्यांनी आपापल्या कोणत्याही वर्षीच्या प्रकाशित असलेल्या काव्यसंग्रहाच्या तीन प्रती, त्यासोबत कवीने स्वतःचा बायोडाटा, आधार कार्ड झेरॉक्स, व दोन फोटोसह कवीचा फोन नंबर व पूर्ण पत्ता पाठवणे आवश्यक आहे.

तसेच कविता या मराठी भाषेत असाव्या .सर्वात उत्कृष्ट काव्यसंग्रहाला विशेष पारितोषिक देण्यात येईल. तसेच प्रमाणपत्र ही देण्यात येईल. एका कवीला एकापेक्षा अनेक पुस्तके सुद्धा पाठवता येतील; मात्र ती प्रकाशित असावीत . कवींनी पुस्तके खालील पत्त्यावर पाठवावी जैन एज्युकेशनल मेडिकल अँड सोशल फाउंडेशन कार्यालय, डॉ. छाया जैन (तातेड), १५- महावीर नगर ,उस्मानपुरा पोलीस स्टेशन जवळ, जनता दूध डेअरी समोर, शक्तिमान वॉशिंग Butterfly बाजूला, पीर बाजार दर्गा रोड, छत्रपती संभाजी नगर पिन कोड ४३१००५ फोन नंबर - ९०२२५११४२७


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002


## औराळा आरोग्य केंद्रा अंतर्गत विटा उपकेंद्रावर गरोदर मातांची तपासणी



**औराळा (अक्षय चव्हाण) :** आज प्रा आ केंद्र औराळा येथील विटा उपकेंद्रावर डॉ जयदीप झगरे व डॉ प्रतीक्षा राजपूत यांच्या उपस्थितीत परिचारिका वैशाली पिंपळे यांनी सर्व गरोदर मातेची तपासणी केली.

तसेच डॉ झगरे, राजपूत व परिचारिका पिंपळे यांनी गरोदर मातेने स्वतःची व आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. सर्व गरोदर मातेची महालॅब अंतर्गत प्रयोगशाळा तंत्रज्ञ अक्षय चव्हाण यांनी सर्वांची रक्त तपासणी केली.

## सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी नाविन्यपूर्ण व्यवसायांचा अंगिकार आवश्यक - केंद्रीय सहसचिव पंकजकुमार बन्सल




**छत्रपती संभाजीनगर, :** केंद्रशासनाच्या 'सहकारातून समृद्धी' या महत्त्वाकांक्षी योजनेनुसार सहकार चळवळ बळकट करण्यासाठी आधुनिकीकरण व नाविन्यपूर्ण व्यवसायांचा अंगिकार करणे आवश्यक आहे. त्याकरीता जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे अद्यावतीकरण करावे,असे निर्देश सहकार विभागाचे केंद्रीय सहसचिव पंकजकुमार बन्सल यांनी आज दिले.

केंद्रीय सहसचिवांच्या प्रमुख उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीस एन.सी.डी.सी.चे अधिकारी विनित नारायण, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, विभागीय सह निबंधक शर्द जरे, नाबार्डचे क्षेत्रिय व्यवस्थापक सुरेश पटवेकर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था डॉ. मुकेश बारहाते, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन शा. ना. साळे, जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी मनिषा हराळ मोरे, वीज वितरण कंपनीचे संदीप दरवडे, जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी मधुरिमा जाधव, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अजय मोटे तसेच अन्य विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सहकार विभागांतर्गत येणाऱ्या केंद्रीय योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात नवीन विविध कार्यकारी सेवा सोसायट्या स्थापन करणे, विविध कार्यकारी सेवा संस्थांनी नाविन्यपूर्ण व्यवसाय सुरु करणे. डेअरी, मत्स्य व्यवसाय, जनऔषधी केंद्र, धान्य गोदामे, खते-बि-बियाणे, पेट्रोल पंप इ. गोदाम बांधकामांसाठी प्रस्ताव तयार करणे, आपले सेवा केंद्र सारखे सेवा केंद्र सुरु करणे.

धान्य खरेदी केंद्र सुरु करता यावे यासाठी विविध तांत्रिक बाबींची पूर्तता करणे अशा विविध विषयांबाबत आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्यात सहकारी संस्थांमार्फत करता येण्यासारख्या मत्स्य व्यवसाय, दूध संकलन केंद्र, दाळ प्रक्रिया व्यवसाय अशा विविध व्यवसायांच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला. तसेच सहकारी संस्थांचे संगणकिकरण करुन त्यांचे अद्यावतीकरण करण्याबाबतही आढावा घेण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ डिसेंबर २०२४


# आत्म्यास पंख फुटले गेला भ्रमण कराया, कविते उभी रहा तू मागे स्मरण कराया.

## गझल गायनातून सतीश दराडे ह्यांना श्रध्दांजली अर्पण..




**छत्रपती संभाजीनगर : (गिरीष जोशी)** मराठी गझलेचे भूषण असणारे दिवंगत गझलकार कै.सतीश दराडे यांच्या स्मरणार्थ विख्यात गझल गायक,संगीतकार प्रा.राहुल देव कदम ह्यांच्या 'उगा जन्मते का घरंदाज कविता ' ह्या सुरेल गझल मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. साहित्य, संगीत कला मंच व ट्रान्स डेल्टा फाऊंडेशन ह्यांच्या वतीने सदरील कार्यक्रम मृद्गंध कलादालन येथे संपन्न झाला.

प्रा. राहुलदेव कदम ह्यांनी कै.सतीश दराडे ह्यांच्या अवीट गझला खास शैलीत गायल्या.सुरेश भटांच्या ' 'उरले तरी बिचाऱ्या शब्दात काय आता ' ह्या गझलेने मैफलीचा आगाज झाला.मी कुठे जन्मभर संगती मगतो,मी तिचा टवका मला उडवा कुणी, रात्र काळोखी तरीही धग उशाला, चोहीकडून आली बागेस कुंपणे, पायात बांधुनी चकवा, डोळ्यात घेऊनी वणवा, दुनियेत पुन्हा रमलो हे ही पुष्कळ झाले, आत्म्यास पंख फुटले गेला भ्रमण कराया, तुला माझी सवय जडली, नका काढू मढ्याची जात लोकानो इत्यादी रचना सादर करून प्रा कदम ह्यांनी सतीश दराडे ह्यांना स्वरश्रद्धांजली अर्पण केली.

सभागृहातील रसिक सतीश दराडे ह्यांच्या आठवणीत रमून गेले. उत्तम गझलांची निवड,त्यास साजेशा चाली, अभ्यासपूर्ण गायनातून शेर उलगडून दाखवण्याचे कसब आणि दिलखेचक सुरावट ही राहुलदेव कदम ह्यांच्या गझल गायकीची वैशिष्ट्ये श्रोत्यांना खिळवून ठेवणारी होती.

गझलकार जयदीप विघ्ने ह्यांनी, नाही पुन्हा बिलगली आत्यास मोहमायामी एकदाच रडलो काळिज नितळ करायाही गझल सादर करून सतीशजींच्या आठवणींना उजाळा दिला. मारोती मानेमोड ह्यांनी, तिच्या पोटातली गुपिते कशी सांगू समुद्रालानदीचे बाळ आहे मी मला डोहातले कळते.

ही गझल सादर केली आणि सतीश दराडे ह्यांच्या विषयी सद्भावना व्यक्त केल्या. रमेश ठोंबरे ह्यांनीरानात श्वापदांच्या आयुष्य काढल्यावरकिंचाळतो म्हणे तो माणूस पाहिल्यावरही गझल सादर करत सतीशजींना अभिवादन केले. गिरीश जोशी ह्यांनी, जीव आंब्याची डहाळी होत जातोकाय गाते कोकिळा माहीत नाही. ही गझल सादर केली. गायन आणि अभिवाचनाची ही हृद्य मैफल सुरुवातीपासून शेवटपर्यंत अत्यंत उंचीवर पोहोचली. तबल्यावर गजानन धुमाळ, संवादिनीवर शांतीभूषण देशपांडे, व्हायोलिन वर प्रबोध जोशी इत्यादी कलाकारांनी जबरदस्त साथसंगत केली.तत्पूर्वी विजय पोहनेरकर, महेश देशमुख, मृणाल देशपांडे, श्री अरुण देशमुख ह्या मान्यवरांनी गझलसम्राट सुरेश भट, कै.सतीश दराडे ह्यांच्या प्रतिमेचे पूजन केले.प्रशांत नानकर ह्यांनी प्रास्ताविक केले. श्रीकांत उमरीकर ह्यांनी बहारदार सूत्र संचालन करत मैफलीत रंग भरले.मैफलीच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशांत नानकर, श्रीकांत उमरीकर,गिरीश जोशी,अविनाश ठिगळे ह्यांनी श्रम घेतले.यावेळी प्रा विजय पोहनेरकर, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी, प्रा. गजानन केचे,शैलेश देशपांडे सचिन नेवपुरकर,श्रीकांत कुलकर्णी,वर्षा जोशी, वैभव पांडे, सुशील देशमाने, सुनील उबाळे, हर्षल पवार,विनायक दास, संध्या अर्चीतलवार, कल्पना घुगे, सुहास महाजन, सचिन वालतुरे, संदेश वाघमारे, संदीप ढाकणे, संजय घोगरे, इत्यादी कवी, साहित्यिक उपस्थित होते.

शहरातील गझल रसिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून ह्या गझल मैफलीचा आस्वाद घेतला. ही मैफल म्हणजे सतीश दराडे ह्यांना शब्दमय,संगीतमय श्रद्धांजली होती.

## वैद्यकीय विद्याशाखेच्या लेखी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारे पाठवण्याचे परीक्षामंडळाचे निर्देश

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे हिवाळी-२०२४ दुसऱ्या टप्प्यातील वैद्यकीय विद्याशाखेच्या व्दितीय वर्षातील दि. ११, १३व १९ डिसेंबर २०२४ रोजीच्या विषयांची प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारा संबंधित परीक्षा केद्रांवर पाठविण्याचे निर्देश विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने दिले आहेत.

विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले की, वैद्यकीय विद्याशाखेच्या हिवाळी-२०२४ दुसऱ्या टप्प्यातील लेखी परीक्षांचे प्रश्नपत्रीका लिक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणाचा तपास करणेस्तव विद्यापीठ स्तरावर उच्च चौकशी समिती व संबंधित महाविद्यालयांमध्ये समिती नियुक्त करण्यात करण्यात आलेली असून चौकशीची कार्यवाही चालू आहे.

तसेच पुढील शहानिशा करणेस्तव Cyber Cell अंतर्गततसेच स्थानिक पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रकाराबाबत एकसूत्रता येणेस्तव दि. १० डिसेंबर २०२४ रोजी तातडीने मा.परीक्षा मंडळाची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये, यापुढील द्वितीय वर्षएम.बी.बी.एस. (सी.बी.एम.ई.-२०१९) या अभ्यासक्रमाचे म्हणजेच दि. ११डिसेंबर २०२४ रोजीचा Microbiology - I व दि. १३ डिसेंबर २०२४ रोजीचा पेपरहोण्याआधी ई-मेलद्वारा पाठविण्यात येणार आहे. ई-मेलमुळे प्रश्नपत्रिकापाठविण्यात येणार असल्याने अधिक वेळ वाढणार आहे याची नोंद घ्यावी.

दि. ०९ डिसेंबर २०२४ (Pathology -II) रोजी दुपार सत्रामध्ये आयोजितद्वितीय वर्ष एम.बी.बी.एस. (सी.बी.एम.ई.-२०१९) या अभ्यासक्रमाचे पेपरसुरु होण्याआधी लिक झाल्याची बातमी विद्यापीठाला कळताच, परीक्षाकेंद्रांना उक्त विषयाच्या नवीन प्रश्नपत्रिका ई-मेल करण्यात आलीव परीक्षार्थीना देण्यात आली.

सदर परीक्षे दरम्यान विद्यार्थ्यांना तसेच पालकांना झालेल्या तसदीबद्दल विद्यापीठने दिलगीरी व्यक्त केली आहे. विद्यापीठ हिवाळी-२०२४ टप्पा-२ मध्ये MBBS (OLD) -II, III (I) &III (II) year and MBBS (CBME-२०१९)-II year च्या परीक्षा दि. ०२ डिसेंबर २०२४ ते १६ डिसेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील एकूण ५० परीक्षा केद्रांवर आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर परीक्षा केद्रांवर एकूण ८२२६ वैद्यकिय विद्यार्थ्यांपैकी ७९३९ विद्यार्थी द्वितीय वर्ष एम.बी.बी.एस. (सी.बी.एम.ई.-२०१९) या अभ्यासक्रमाचे आहेत. सदर परीक्षे दरम्यान दि. ०२ डिसेंबर २०२४ (Pharmacology-I) व दि. ०९ डिसेंबर २०२४ (Pathology-II) रोजी दुपार सत्रामध्ये आयोजित द्वितीय वर्ष एम.बी.बी.एस. (सी.बी.एम.ई.-२०१९) या अभ्यासक्रमाचे पेपर लिक झालेले आहेत. Microbiology-I आणि II या विषयाच्या परीक्षा केंद्रांना देण्यात आलेल्या सर्व प्रश्नपत्रीका सीलबंद अवस्थेत ठेवण्यात याव्यात व नवीन प्रश्नपत्रिका पेपर सुरु होण्याआधी ई-मेलद्वारे पाठविण्यात याव्यात असे ठरले.

हिवाळी-२०२४ टप्पा-२ मधील दि. ०२ डिसेंबर २०२४ रोजीचा Pharmacology-I याविषयाचा पेपर दुपार सत्रामध्ये पार पडला व नंतर लिक झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे, दि. ०३ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या मा. परीक्षा मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे उक्त दिनांकाचा पेपर दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी ०२.०० ते ०५.०० या वेळेत दुपारच्या सत्रात घेण्यात येणार असल्याचे संबंधित महाविद्यालयांना तसेच परीक्षार्थी नाही कळविण्यात आलेले आहे

# 'कन्नड तालुका साहित्य सन्मान' पुरस्कार मा.आ. तेजस्विनी जाधव यांना जाहीर



**कन्नड (अरुण थोरात):** त्रैमासिक तिफण व भाषा साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषदे च्या वतीने दिला जाणारा यंदाचा "कन्नड तालुका साहित्य सन्मान-२०२४" पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका मा.आ. तेजस्विनीताई रायभान जाधव यांना जाहीर झाला आहे.

दि ५ जानेवारी रोजी मेहगाव ता.कन्नड येथील भगवानगडावर आयोजित सातव्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.कन्नड तालुक्यातील साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो.

आता पर्यंत डॉ. रमेश सुर्यवंशी, प्रा. अंबादास सगट, पुष्पाताई दाभाडे, प्रा. रंगनाथ लहाने, अशोकराव पवार आदिंना हा पुरस्कार देण्यात आला आहे. यंदाचा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका मा.आ. तेजस्विनी जाधव यांना जाहिर करण्यात आला आहे.

मा.आ. तेजस्विनी जाधव यांचा अंतरंग हा पहिला कथासंग्रह आहे. त्यांचे एकुण तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. सम्राज्ञी ही त्यांची कादंबरी गाजली होती. तसेच 'रायभानजी जाधव व्यक्ती आणि विचार' या पुस्तकासह त्यांनी इतर दहा पुस्तकांचे लेखन केले आहे.

त्यांनी पुणे विद्यापीठातून बी.ए. प्रथम श्रेणी मिळवली होती. तसेच मुंबई विद्यापीठातून एम.ए. प्रथम श्रेणी सह गोल्ड मेडल मिळविले होते. त्यांची इंग्रजी शाळा' नावाची कथा डॉ. बा. आं.म. विद्यापीठातील मराठी अभ्यासक्रमात होती. त्यांनी आपल्या राजकीय जिवनात ही साहित्य लेखन जपले होते.

त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, भगवान गडाचे अध्यक्ष सुधीर घुगे, स्वागताध्यक्ष गणेश घुगे, कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, संदीप ढाकणे, भीमराव सोनवणे, श्रीराम दापके, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड, अनिता राठोड, शुभदा देवरे, गीतांजली गजबे, अर्चना धाटबळे, सुरेश औटे, भरत सोनवणे आदींनी अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ डिसेंबर २०२४


## चंपावती कन्या विद्यालयात, एक पेड माँ के नाम' उपक्रम संपन्न



**कन्नड (अरुण थोरात):** महाराष्ट्रराज्य पर्यटन संचालनालया च्या प्रादेशिक कार्यालय संभाजीनगर व भारतीय पर्यटन विभाग अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांत चंपावती कन्या व उच्च माध्यमिक विद्यालय चापानेर ता. कन्नड येथील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शालेय परिसर व शेतात विविध प्रकारच्या झाडाचे वृक्षारोपण करून एक पेड माँ के नाम हा उपक्रम यशस्वी साजरा करण्यात आला.

या उपक्रमा द्वारे विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वनस्पतीची ओळख करून देण्यात आली. त्यामुळे पर्यावरणाच्या संरक्षण साठी वनस्पतीचे जतन आणि संवर्धन करणे किती महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना या उपक्रमातून समजले, पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगरचे उपसंचालक प्रबोधन जी मुळे, सहाय्यक संचालक विजयजी जाधव, भारतीय पर्यटन मंडळाच्या सहाय्यक संचालिका श्रीमती मालती दत्ता, युवा पर्यटन मंडळाचे सचिन चव्हाण यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

मराठवाडा विभागातून चंपावती कन्या विद्यालयास तृतीय पारितोषिक प्राप्त झाले असून त्यात स्मृतिचिन्ह व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्या सुजाता पवार, सचिन चव्हाण, प्रा.एस बी धामणे, प्रा. संतोष शिरसाठ, संदीप पाटील, कैलास पवार, शिवाजी घुले, संतोष उघडे, प्रा.अर्जुन गोडसे, श्रीमती पदमे, श्रीमती देशपांडे व चंपावती कन्या विद्यालयातील सर्व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## भाजप जिल्हासचिव पदी अनिल चव्हाण यांची नियुक्ती



**कन्नड (अरुण थोरात):** भारतीय जनता पार्टी संभाजीनगर (दक्षिण) जिल्हा सचिव पदी अनिल बाबूराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी नियुक्ती पत्राद्वारे ही नियुक्ती केली आहे.

अनिल चव्हाण हे अंबातांडा ता. कन्नड चे भूमीपुत्र असून त्यांनी विविध राजकिय पदां बरोबरच सामाजिक क्षेत्रात मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, क्रिडा क्षेत्रातील विविध उपक्रमांद्वारे त्यांनी तालुक्यात संघटन मित्रपरिवार ऊभा केला आहे. तांडा समृध्दी योजना राबविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल भाजप जेष्ठ नेते डॉ. संजय गव्हाणे, उत्तमराव राठोड साहेब, तालुकाध्यक्ष किशोर आबा पवार, गणेश घुगे, कैलास जाधव, सुभाष आबा काळे, रामा मुळे,सुनिल पवार, प्रदिप बोडखे, प्रशांत अग्रवाल, राजेंद्र गव्हाणे, सुनील निकम, अरुण थोरात, सुदाम पवार, गणेश चव्हाण, संतोष जाधव, अनिल सिरसाट, मोहित जैन, विकास भारूका, गणेश बळे, अरुण राठोड, बंटी इंगळे, अरुण राठोड, आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ डिसेंबर २०२४







# छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील करिअर संसदेच्या विद्यार्थ्यांनी पोलीस निरीक्षक अश्विनीताई भोसले यांचा मुलाखतीतून साकारला जीवनपट..





**मुरुम : (प्रा. सुधीर पंचगल्ले)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती सहायता केंद्र आयोजित करिअर कट्टा सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालय श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात कार्यरत करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी यशाची त्रिसूत्री दिली आहे. पहिले सूत्र म्हणजे प्रत्येक महिन्यात एक पुस्तक वाचावे, दुसरे सूत्र एका यशस्वी व्यक्तीच मुलाखत मुलाखती मधुन जीवनपट वाचावा अथवा समजावा आणि तिसरे सूत्र म्हणजे एका महिन्यात एक नवीन कौशल्य आत्मसात करावे.

या त्रिसूत्रापैकी आज करिअर संसदेच्या वतीने प्रशासकीय अधिकारी मा. पोलीस निरीक्षक अश्विनीताई भोसले यांच्या मुलाखतीचे आयोजन महाविद्यालय करिअर कट्टा डिजिटल क्लासरूम करण्यात आले होते. या मुलाखतीमध्ये विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी गणेश मोरे, प्रज्वल चव्हाण, निळकंठ गायकवाड, प्रसाद ममाळे, रणखांब दिपाली, सूर्यवंशी सुशील, पांचाळ भाग्यश्री, सोनटक्के अनुराधा, पाटील अश्विनी यांनी विविध प्रश्न विचारून घेतली मुलाखत. प्राथमिक शिक्षण ते एक प्रशासकीय अधिकारी पर्यंतचा जीवनपट कसा वाटतो? यावर बोलताना अश्विनी मॅडम यानी सातारा येथे प्राथमिक शिक्षण घेत असताना करावी लागणारी कामे, कालांतराने मुंबई येथे वास्तव्य केल्यानंतर दुधाच्या पिशव्या, वर्तमानपत्रे विकण्याचेही केलेले काम सांगताना कोणतेही काम करा पण श्रमाला प्रतिष्ठा द्या असा संदेश दिला.

या मुलाखततीत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर देतांना अश्विनी मॅडम यानी आपला बालपणापासून ते आजपर्यंतच्या पोलिस प्रशासनातील अनुभव सांगताना एक स्त्री म्हणून प्रशासनात सेवा बजावताना घरातून आलेल्या अडचणी याबरोबरच समाजातून माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यावर कशी मात केली, त्याला कसे सामोरे जावे लागले याबाबतचे प्रसंग विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारे असेच होते. जीवनातील अति आनंदाचा प्रसंग कोणता? याबद्दल बोलताना त्यानी माझ ध्येय पूर्ण होऊन प्रशासनातील खाकी वर्दी घातलेला दिवस हा आनंदाचा दिवस होता. कारण पोलिस प्रशासनात जाऊन सेवा करणे हा महत्त्वाचा उद्देश समोर ठेवून अभ्यास आणि परिश्रम केले.

म्हणुन विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्न बघायला शिका आणि ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करा असे आवाहन केले.प्रशासकीय सेवा करत असताना काही राजकारणी लोकांचा दबाव येतो का? निश्चितपणे दबाव असतो पण ते पेल ण्याचं सामर्थ्य आपल्या अंगी असणं गरजेचं आहे. चांगल्या कार्यासाठी काही वाईट प्रसंगांना देखील तोंड द्यावे लागते.

त्यामुळे निराश किवा उदासीनता बाळगू नका असाही उपदेश दिला.आधुनिक काळातील विद्यार्थ्यांसाठी आपला संदेश काय असेल? विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळ, वक्तृत्व, व अन्य कौशल्य आत्मसात केली पाहिजेत. स्पर्धा परीक्षा तयारी करण्यासाठी सोशल मीडियाचा योग्य वापर करा.

सोशल मीडिया youtube व्हाट्सअप यावर आलेली सर्वच माहिती बरोबर असतेच असे नाही. त्यामुळे मूळ संदर्भ ग्रंथ अध्ययन करणे महत्त्वाचे आहे. वाचन संस्कृतीची जोपासना केली पाहिजे. वर्तमानपत्रातील अग्रलेख, वाचकांची पत्रे वाचली पाहिजेत. मॅडमनी प्रशासकीय सेवा करत असताना संत साहित्य यावर पीएचडी प्रबंध सादर केला.

मग संशोधन क्षेत्राकडे त्यांना का वळावे वाटले? यावर बोलताना अध्यात्माची आवड असल्याकारणाने मी संत साहित्याची फलश्रुतता या विषयावर पीएचडी प्रबंध सादर केला आहे. विद्यार्थी संसदेच्या विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना उत्तर देतांना अश्विनी भोसले यांचा जीवनपट विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरची दिशा देणारा असाच ठरला.

या उपक्रमांसाठी महाविद्यालय करिअर कट्टा विद्यार्थी संसदेचे मंत्री आणि सदस्यांनी पुढाकार घेतला.त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य आणि करिअर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ संजय अस्वले, समन्वयक डॉ एस पी पसरकल्ले, डॉ ए. के कटके, डॉ सी डी करे यांचे मार्गदर्शन लाभले 1. यावेळी उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले यांची उपस्थिती होती.